RIGHT TO INFORMATION
सूचना का अधिकार

महाराष्ट्र शासन
स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,महाराष्ट्र राज्य
कोंकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई- ४००६१४
☎/ 🖷:- ,२७५७१३९१. Website:www.mahalfa.in E.Mail:ad.admin@mahalfa.in

क्र स्था.१८/ब/ /२०१६-१७/ल.ले (व)/ गोपनीय पत्रासंबंधी कार्यवाही / ०१ / दिनांक: 22 FEB 2018

## परिपत्रक

संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयात प्राप्त होणारे गोपनीय पत्रे ,तक्रारी इ.पत्रावर कार्यवाही केल्यानंतर संबंधित शाखांनी गोपनीय पत्राचा पत्रव्यवहार करताना त्यामध्ये सुसूत्रता येणे आवश्यक आहे.

वरीष्ठ लधुलेखक या कार्यासनाने कार्यालयात प्राप्त होणारी मा. संचालक व मा. सहसंचालक यांनी येणारी पत्रे ,गोपनीय पत्रे अर्धशासकीय पत्रे ,वित्त विभाग मंत्रालय यांच्याकडून येणारी पत्रे व बैठकीचे पत्रे या आवक पत्राची नोंद घेऊन संबंधित वरीष्ठ अधिका-यांकडे कार्यवाही साठी देण्यात यावी.

कार्यालयातील कार्यरत शाखांनी गोपनीय पत्रावर गोपनीय कार्यवाही करताना सदर पत्रे ज्या कार्यासनाकडून टंकलिखित होतात त्या कार्यासनाच्या संबंधित कर्मचा-यांने गोपनीय पत्राची जावक क्रमांकाची नोंदवही तयार करुन त्या पत्रास जावक क्रमांक देऊन ते पत्रे पाकीटात टाकून आवक-जावक कार्यासनाकडे दयावे. आवक-जावक कार्यासनाने त्यांच्याकडे कार्यालयातून येणा-या गोपनीय पत्राची नोंदवही तयार करुन त्या - त्या शाखेचे नाव व त्यासमोर पाकीटावर लिहिलेला जावक क्रमांक व कोणास पत्र पाठविले आहे त्या कार्यालयाची नोंद घ्यावी.

(प्रताप मोहिते)
संचालक,
संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य